अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 03 सप्टेंबर 2026 | वर्ष 12 वे | अंक 04 था | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## सत्तूरने जीवघेणा हल्ला करणाऱ्या नवऱ्याला ५ वर्षे सक्तमजुरी

### तीन वर्षापूर्वी ब्रम्हपुरीत घडला होता धक्कादायक प्रकार

ब्रह्मपुरी/का.प्र.

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिच्यावर सत्तूरने प्राणघातक हल्ला करणाऱ्या मुनिम तुळशीराम नागदेवते (वय ५९, रा. उदापूर, ता. ब्रह्मपुरी) या पती आरोपीला चंद्रपूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने दोषी ठरवत ५ वर्षांची कठोर कारावासाची शिक्षा ठोठावली आहे. तसेच ५,००० रुपये दंड आणि दंड न भरल्यास १ महिन्याचा अतिरिक्त साधा कारावास भोगावा लागेल, असा आदेश न्यायालयाने दिला आहे.

दिनांक ३ फेब्रुवारी २०२३ रोजी दुपारी २:३० वाजेच्या सुमारास ही घटना घडली होती. पीडित पत्नी मंगला मुनिम नागदेवते (वय ५३, रा. उदापूर, ता. ब्रह्मपुरी) या आपले हॉस्पिटलचे काम आटपवून घरी परत येत असताना, आरोपी पती मुनिम नागदेवते याने स्वागत मंगल कार्यालयामागे त्यांना गाठले आणि 'घरी चाल' असे म्हटले. मंगला यांनी घरी जाण्यास नकार दिला असता, चारित्र्याच्या संशयातून आरोपीने स्वत:जवळील सत्तूरने त्यांच्या डोक्यावर, हातावर आणि पायावर वार करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला.



या प्रकरणी पीडिता मंगला नागदेवते यांच्या बयानावरून आणि वैद्यकीय अहवालावरून पोलीस ठाणे ब्रह्मपुरी येथे तात्काळ गुन्हा नोंद (क्र. ४८/२०२३, कलम ३०७ भादंवि) करून आरोपी मुनिम नागदेवते याला अटक करण्यात आली होती. तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक सुरेंद्र प्रभाकर उपरे यांनी या गुन्ह्याचा सखोल तपास केला. त्यांनी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, वैद्यकीय अहवाल आणि महत्त्वाचे परिस्थितीजन्य पुरावे गोळा करून वेळेत न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर खटल्याची सुनावणी पी. एम. गुप्ता, जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूर यांच्या न्यायालयात पार पडली. सरकार पक्षातर्फे सरकारी अभियोक्ता ?ड. सुधाकर डेगावार यांनी मांडलेला युक्तिवाद आणि सादर केलेले साक्ष-पुरावे मा. न्यायालयाने ग्राह्य धरले. त्यानुसार ३१ ऑगस्ट २०२६ रोजी न्यायालयाने आरोपी मुनिम नागदेवते याला कलम ३०७ भादंवि अंतर्गत दोषी ठरवून ५ वर्षे सक्त मजुरी व दंडाची शिक्षा सुनावली.

ही संपूर्ण कामगिरी चंद्रपूरचे पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी ब्रह्मपुरी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या खटल्यात कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून पोलीस अंमलदार प्रकाश शेंदरे आणि दोषसिद्धी कक्ष, चंद्रपूर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

## नादेय प्रमाणपत्रासाठी शेतकऱ्यांचा गांगलवाडीतील स्टेट बँकेला घेराव

### लॉक केलेली बँक खाती सुरु करण्याची मागणी अन्यथा आंदोलनाचा इशारा

ब्रह्मपुरी/का.प्र.

सध्या शेतीचा हंगाम सुरू असताना भारतीय स्टेट बँक शाखा गांगलवाडी प्रशासनाच्या मनमानी कारभारामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. पीक कर्जासाठी आवश्यक असलेले ना-देय प्रमाणपत्र तातडीने देण्यात यावे आणि थकीत कर्जाच्या नावाखाली शेतकऱ्यांची बेकायदेशीरपणे लॉक केलेली बँक खाती पूर्ववत सुरू करण्यात यावीत, या प्रमुख मागण्यांसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या (भाकप) नेतृत्वात संतप्त



शेतकऱ्यांनी २८ ऑगस्ट २०२६ रोजी गांगलवाडी स्टेट बँकेला घेराव घालून जोरदार आंदोलन केले.

या आंदोलनाचे नेतृत्व भाकप चंद्रपूर जिल्हा सहसचिव कॉ. विनोद झोडगे यांनी केले. यावेळी निरंजन रंगारी बँक शाखा व्यवस्थापकांना मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. त्यात खरीप शेतीचा हंगाम सुरू असून दरवर्षीप्रमाणे शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते व इतर शेतीकामांसाठी पीक कर्जाची नितांत गरज आहे. मात्र, गांगलवाडी शाखा नियमानुसार शेतकऱ्यांना ना-देय प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ करत असल्याने शेतकरी कर्जापासून वंचित राहत आहेत. याकरीता बँकेद्वारे नादेय प्रमाणपत्र त्वरीत देण्यात यावे, थकीत कर्जाचे कारण पुढे करून बँकेने अनेक शेतकऱ्यांची सुरू असलेली बँक खाती मनमानी पद्धतीने लॉक केलेली आहेत, ती तातडीने अनलॉक करण्यात यावीत, शासनाच्या विविध कृषी व कल्याणकारी योजनांअंतर्गत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणारे शासकीय अनुदान आणि इतर हक्काचे पैसे बँक नियमबाह्य परस्पर कपात करत असल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला असून ही कपात त्वरित थांबवण्याची मागणी करण्यात आली.

शेतकऱ्यांच्या या न्याय्य मागण्यांवर बँकेने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशारा कॉ. विनोद झोडगे यांनी बँक प्रशासनाला दिला. या निवेदनाची प्रत ब्रह्मपुरी तहसीलदार यांनाही पुढील कारवाईसाठी सादर करण्यात आली आहे. या घेराव आंदोलनात बरडकिन्ही येथील उपसरपंच भास्कर गोटेफोडे, सुनील शेंडे, माजी उपसरपंच विनोद पाटील, गोलू दरवे, डेबूजी भोयर, गोवर्धन शेंडे, हरिदास मेश्राम, महादेव प्रधान, पंढरी दोनाडकर, मधुकर शेंडे, योगेश मलोडे, दीपक देशमुख यांसह परिसरातील शेतकरी व भाकप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.




अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार वाचा या लिंक वर...
www.bramhapurisamachar.com/bs

## संपादकीय...

# जलजीवन की कंत्राटदारांचे 'जीवन'?

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सादर झालेल्या भारताच्या नियंत्रक आणि महालेखापरीक्षक अर्थात कॅगच्या अहवालाने जलजीवन मिशनच्या कारभारातील अनेक त्रुटींवर बोट ठेवले आहे. राज्यात सुरू करण्यात आलेल्या सुमारे ५१ हजार ५६० पाणी पुरवठा योजनांपैकी केवळ १२ हजार ७०३ योजना म्हणजेच अवघ्या २४.६४ टक्के योजना पूर्ण झाल्या आहेत. तब्बल ३८ हजार ८५७ योजना अद्याप प्रलंबित आहेत. म्हणजे तीनपैकी जवळपास अडीच योजना अजूनही अपूर्ण! मग 'हर घर जल'चा गजर नेमका कोणासाठी ? योजनेचा खर्च दुप्पट होऊनही कामे अपूर्ण राहणे ही केवळ प्रशासकीय चूक नाही, तर सार्वजनिक पैशांच्या नियोजनाचा गंभीर प्रश्न आहे. सुरुवातीला चुकीचे आराखडे तयार केले, सर्व्हेक्षणात त्रुटी राहिल्या, अंमलबजावणीत विलंब झाला, नंतर तांत्रिक बदल झाले आणि अखेरीस जीएसटी वाढल्याचे कारण पुढे करून सुधारित प्रशासकीय मान्यता दिली गेली. ही कारणे कागदावर कितीही आकर्षक वाटली तरी जनतेच्या नजरेत त्याचा अर्थ एकच; पहिले चुकीचे नियोजन करा, नंतर त्याचा खर्च जनतेच्या माथी मारा!

विशेष म्हणजे, खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच जलजीवन योजनेचा चुकीचा आराखडा तयार झाल्यामुळे खर्च वाढल्याची कबुली विधिमंडळात दिली आहे. ही कबुली महत्त्वाची आहे. कारण चूक झाली हे मान्य झाले, तर त्या चुकीची जबाबदारी कोणाची? चुकीचे सर्व्हेक्षण करणाऱ्यांवर कारवाई झाली का? चुकीचा आराखडा मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित झाली का? कंत्राटदारांनी मूळ आराखड्यानुसार काम का केले नाही? आणि जर तांत्रिक बदल इतके अपरिहार्य होते, तर ते मूळ नियोजनात का दिसले नाहीत? या प्रश्नांची उत्तरे सरकारने जनतेला दिली पाहिजेत. सरकार म्हणते, जीएसटी वाढला म्हणून खर्च वाढला. ठीक आहे. पण जीएसटी हा खर्चवाढीचा एक भाग असू शकतो; तो चुकीच्या आराखड्याचा, चुकीच्या सर्व्हेक्षणाचा आणि वर्षानुवर्षे चाललेल्या विलंबाचा उतारा नाही. एखाद्या योजनेचा खर्च दोनपट, तीनपट वाढत असेल तर त्या वाढीचे स्वतंत्र लेखापरीक्षण झाले पाहिजे. प्रत्येक रुपयाचा हिशेब जनतेसमोर आला पाहिजे. अन्यथा 'सुधारित प्रशासकीय मान्यता' हा शब्द सरकारी कागदपत्रातील सभ्य पर्याय ठरेल आणि प्रत्यक्षात तो जनतेच्या पैशांची वाढती उबळपट्टी ठरेल. याहून गंभीर बाब म्हणजे केंद्राकडून निधी मिळविण्यासाठी आवश्यक उपयोगिता प्रमाणपत्रे वेळेवर सादर न केल्यामुळे महाराष्ट्राला अपेक्षित निधीपैकी केवळ ४६.३ टक्के निधी मिळाल्याचे कॅगने नमूद केले आहे. म्हणजे पैसा मिळत नाही म्हणून योजना रखडल्या असे नाही; पैसा मिळवून घेण्यासाठी आवश्यक असलेली प्रशासकीय यंत्रणाही आपले काम वेळेत करत नाही. एका बाजूला निधीची कमतरता आणि दुसऱ्या बाजूला निधी मिळविण्याची संधी दवडणारे प्रशासन या दोन्ही कात्रीत महाराष्ट्रातील सामान्य माणूस अडकला आहे.

जलजीवन मिशन ही केवळ सरकारी योजना नाही. ती ग्रामीण महाराष्ट्राच्या आरोग्याशी, महिलांच्या श्रमाशी आणि गावांच्या भवितव्याशी जोडलेली योजना आहे. घरापासून मैलोन्मैल डोक्यावरून हंडा आणणाऱ्या महिलांना नळाचे पाणी मिळणार होते. शाळा, अंगणवाडी आणि घराघरात स्वच्छ पाणी पोहोचणार होते. त्यासाठी हजारो कोटी रुपये मंजूर झाले. पण जर नळ बसले, पाईपलाइन टाकल्या आणि तरीही नळातून पाणी आले नाही, तर त्या नळाचा उपयोग काय? जलजीवन मिशनमधील प्रत्येक अपूर्ण योजनेची कारणे जाहीर करावीत, खर्च वाढलेल्या प्रत्येक प्रकल्पाचे स्वतंत्र परीक्षण करावे. मूळ अंदाज आणि सुधारित खर्चातील तफावत जनतेसमोर ठेवावी. जबाबदार अधिकाऱ्यांची आणि संबंधित यंत्रणांची जबाबदारी निश्चित करावी. कंत्राटदारांचे हित जपण्यासाठी नव्हे, तर नागरिकांच्या पैशाचा आणि पाण्याचा हिशेब देण्यासाठी प्रशासन असते. 'हर घर जल' हे घोषवाक्य कागदावर सुंदर दिसते. पण गावातील कोरडा नळ त्या घोषवाक्याची खिल्ली उडवतो. महाराष्ट्राला नळ नकोत, नळातून पाणी हवे आहे. योजनांची संख्या नको, पूर्ण झालेल्या योजनांचा परिणाम हवा आहे. सुधारित मान्यतांचे गड्डे नकोत, मूळ आराखड्याची जबाबदारी हवी आहे.

# मेजर ध्यानचंद हे आपल्या राष्ट्रीय अभिमान - अशोक भैया

## १०५ कलर होल्डर खेळाडूंचा सत्कार व ब्लेझर प्रदान कार्यक्रम



ब्रह्मपुरी/का.प्र.

'हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद हे राष्ट्रीय खेळाडू होते. त्यांनी रात्रंदिन एक करुन संपूर्ण लक्ष केंद्रित करीत हॉकी खेळात प्राविण्य मिळवले. त्यांनी सतत देशासाठी खेळून देशाला अनेक सन्मान मिळवून दिले. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन आपणही क्रीडा क्षेत्रात उत्तुंग भरारी घ्यावी. हे मेजर ध्यानंद राष्ट्राचा अभिमान आहेत.' असे विचार नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया यांनी मांडले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात 'राष्ट्रीय क्रीडा दिन ' कार्यक्रमात उद्घाटक म्हणून बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर, मेजर प्रा. विनोद नरड, समिती प्रभारी प्रा आकाश मेश्राम, डॉ.के.एम. शर्मा, प्रा.आनंद भोयर उपस्थित होते. याप्रसंगी राज्यस्तरीय, राष्ट्रस्तरीय खेळात प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. ७० विद्यार्थ्यांना कलर होल्डरला ब्लेजर तर १०५ विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयातर्फे दरवर्षी उत्कृष्ट खेळाडूंना अशोक भैया यांचेतर्फे शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते. महाविद्यालयात ३२ प्रकारचे खेळ खेळले जात असून अनेक विद्यार्थी आतंरराष्ट्रीय स्तरावर चमले आहेत. असे अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ शेकोकरांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन डॉ के.एम.शर्मा तर आभार प्रदर्शन प्रा जयेश हजारेंनी केले. कार्यक्रमाला खेळाडूंनी गर्दी केली होती. यशस्वीतेसाठी समिती सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# मानसशास्त्रज्ञ अंकित बुरले यांचे पहिले पुस्तक

# "The Rationalist" ०५ सप्टेंबरला प्रकाशित होणार

## शिक्षकदिनी येणार वाचकांच्या भेटीला; ॲमेझॉनवरही उपलब्ध

ब्रह्मपुरी/का.प्र.

भूत खरंच असतं का? चमत्कार म्हणजे नेमके काय? आणि आपण ज्याला 'सत्य' समजतो, ते खरोखर तसेच असते का? – या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन माणसाच्या मनाचा ठाव घेणारे पुस्तक घेऊन ब्रह्मपुरीचे मानसशास्त्रज्ञ अंकित बुरले साहित्यविश्वात पदार्पण करत आहेत. त्यांचे पहिलेवहिले पुस्तक 'The Rationalist' ५ सप्टेंबर रोजी, शिक्षक दिनाचे औचित्य साधून Amazon वर प्रकाशित होणार आहे.




एमएस्सी अप्लाइड सायकॉलॉजी पूर्ण केलेले बुरले गेल्या पाच वर्षांपासून ब्रह्मपुरीत स्वतःचे मानसशास्त्रीय समुपदेशन केंद्र चालवत आहेत. समुपदेशनाच्या खुर्चीत बसून त्यांनी हजारो मनांचे निरीक्षण केले, आणि याच अनुभवातून विवेकवाद (Rationalism) या विषयावरील त्यांचा जवळपास दहा वर्षांचा संशोधन प्रवास आकाराला आला. २०१५ साली सुचलेल्या एका साध्या शंकेने चार वर्षांपूर्वी पुस्तकाचे रूप घेतले. भूत, आत्मा, चमत्कार आणि अलौकिक शक्तींवर शतकानुशतके माणसाचा विश्वास का बसत आला? विज्ञानाच्या प्रगत युगातही अशा गूढ गोष्टींचे आकर्षण का कायम आहे? मानसशास्त्र, विज्ञान, इतिहास आणि तत्त्वज्ञान यांची सांगड घालत या प्रश्नांचा वेध घेणारे हे पुस्तक वाचकांना उत्तरे देण्याऐवजी योग्य प्रश्न विचारण्यास प्रवृत्त करते, कारण प्रत्येक उत्तराची सुरुवात एका प्रश्नानेच होते – हेच त्याचे खरे वेगळेपण आहे.

पुस्तकाबद्दल बोलताना बुरले म्हणतात, 'सत्य नेहमी सोपे नसते, पण ते शोधण्याचा प्रयत्न सोडून देणे हा त्याहून मोठा धोका आहे.' एका छोट्या शहरातून सुरू झालेला हा साहित्यिक प्रवास त्यांच्या व्यावसायिक कारकिर्दीला नवा आयाम देणारा ठरला आहे.

**ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता**

**www.bramhapuri samachar.com/bs**

**या ऑनलाईन साईटला भेट द्या**

## विनोदिनी

*बायको : (नवऱ्याला) तुमची आई माझी कोण लागते?*
*नवरा : तुझी सासू लागते.*
*बायको : माझी आई तुमची कोण लागते?*
*नवरा : अगं माझी सासू लागते.*
*बायको : या दोघीतला फरक माहिती आहे का?*
*नवरा : माहित आहे... ती तुझी व ही माझी आई आहे.. तरी पण तु सांग काय फरक आहे...???.*
*बायको : माझी आई गावातल्या सगळ्या गोष्टी मला सांगते आणि तुमची आई सगळ्या गावाला माझ्या गोष्टी सांगते...!!!*

# शहराच्या विकासाचा मास्टर प्लॅन तयार करा - नगरसेवक अविनाश राऊत यांची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

वाढती लोकसंख्या, विस्तारणाऱ्या सीमा आणि नागरिकांच्या वाढत्या गरजा या पार्श्वभूमीवर ब्रम्हपुरी शहराचा आगामी १५ ते २० वर्षांचा विचार करून एक 'मास्टर प्लॅन' म्हणजेच सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात यावा, अशी आग्रही मागणी प्रभाग क्रमांक ११ चे नगरसेवक अविनाश राऊत यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना थेट निवेदन सादर केले असून, शासनाकडून निधी मिळवून शहराचा कायापालट करण्याची विनंती केली आहे.

शहराचा विकास हा केवळ एका कामापुरता मर्यादित न राहता सर्वसमावेशक असावा, यावर राऊत यांनी भर दिला. निवेदनात त्यांनी शहराशी निगडित महत्त्वाच्या १३ मूलभूत मुद्द्यांवर लक्ष वेधले आहे. यात प्रमुख आणि अंतर्गत रस्त्यांचे रुंदीकरण, काँक्रिटीकरण व डांबरीकरण करणे. तसेच वाहतूक कोंडी टाळण्यासाठी योग्य नियोजन करणे. भविष्यातील पाण्याची




गरज लक्षात घेऊन पाणीपुरवठा योजना आखणे आणि सांडपाण्यासाठी भूमिगत गटार व्यवस्थेचा विस्तार करणे. पावसाच्या साचणाऱ्या पाण्याचा निचरा करणे, घनकचरा व्यवस्थापन, हरित क्षेत्र वाढवणे, वृक्षारोपण आणि शहरातील प्रमुख चौकांचे सुशोभीकरण करणे. हाय-टेक LED स्ट्रीट लाईट्स, पादचाऱ्यांसाठी फूटपाथ, वाहन पार्किंगची जागा, सार्वजनिक स्वच्छतागृहे आणि डिजिटल नागरी सुविधा उपलब्ध करून देणे आदी मागण्याचा निवेदनात समावेश आहे.

'ब्रम्हपुरीचा विकास एका रात्रीत होणार नाही, त्यासाठी दूरदृष्टी आणि योग्य नियोजनाची गरज आहे,' असे स्पष्ट करत नगरसेवक अविनाश राऊत यांनी या कामासाठी तांत्रिक सर्वेक्षण, GIS मॅपिंग आणि अंदाजपत्रक तयार करण्याची मागणी केली आहे. गरज पडल्यास यासाठी अनुभवी 'प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची' नियुक्ती करावी, जेणेकरून राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध योजनांमधून शहरासाठी भरघोस निधी उपलब्ध करून घेता येईल. नगरपरिषद प्रशासन या प्रस्तावावर काय पावले उचलते आणि ब्रम्हपुरीच्या विकासाचा हा नवा आराखडा कधी प्रत्यक्ष रुपात येतो, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## डॉ. अतुल येरपुडे यांना सुवर्ण विद्यारत्न सन्मान प्रदान

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागाचे प्रा.डॉ. अतुल नत्थूजी येरपुडे यांना महाराष्ट्र स्वर्णकार संस्था, नागपूरतर्फे मानाचा 'सुवर्ण विद्यारत्न सन्मान' नुकताच प्रदान करून त्यांना गौरविण्यात आले. नागपूर येथे आयोजित या दिमाखदार सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून आमदार संजय भेंडे, नागपूर हे उपस्थित होते. याप्रसंगी संस्थेचे




संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम कावळे, नियोजित अध्यक्ष विलासजी बांगरे, महासचिव अनिल मालोकार आणि प्रशांत गुरव हे मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

या मान्यवरांच्या हस्ते डॉ.येरपुडे यांना शाल, श्रीफळ, सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. शिक्षण व संशोधन क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. याआधी संशोधन कार्यासाठी अनेक पुरस्कार मिळाले आहेत. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती स्नेहलताबाई भैया, सचिव अशोक भैया, प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर, डॉ धनराज खानोरकर व प्राध्यापक वृंद यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## अड्याळ टेकडीवर ०७ दिवसीय मौन साधना शिबीर संपन्न



ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील भू-वैकुंठ अड्याळ टेकडीवर दरवर्षीप्रमाणे यावर्षीही २० ते २८ या कालावधीत आयोजित करण्यात आलेले सात दिवसीय 'मौन साधना शिबिर' अत्यंत उत्साहपूर्ण आणि आध्यात्मिक वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाले. भू-वैकुंठ अड्याळ टेकडीचे उत्तराधिकारी व संचालक सुबोधदादा यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सात दिवसांच्या या कालावधीत साधकांसाठी विविध दैनंदिन व आध्यात्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने सामुदायिक ध्यान, व्यक्तिगत ध्यान, सामुदायिक प्रार्थना, श्रमदान आणि सत्संग-प्रवचन यांसारख्या भरगच्च उपक्रमांचा समावेश होता. या उपक्रमांच्या माध्यमातून साधकांनी मौन साधनेचा अनुभव घेत आत्मशांतीचा मार्ग अनुभवला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी आणि व्यवस्थापनासाठी संस्थेचे अध्यक्ष डॉ. नवलाजी मुळे तसेच कार्याध्यक्ष सुश्री रेखाताई, गंगाताई व लक्ष्मीताई यांनी परिश्रम घेतले.

## राधा ऑर्गनायझेशनच्या पुढाकाराने चोरटी शाळेतील अध्यापन प्रभावी होणार

ब्रह्मपुरी/का.प्र.

ग्रामीण भागातील बालकांना उत्तम अन् आधुनिक शिक्षण मिळावे यासाठी सामाजिक बांधिलकी जपणारी 'राधा ऑर्गनायझेशन' पुन्हा एकदा कौतुकास पात्र ठरली आहे. डिजिटल आणि तंत्रज्ञानाधिष्ठित शिक्षणाचा थेट फायदा गावातील विद्यार्थ्यांना व्हावा, या उदात्त हेतूने संस्थेचे अध्यक्ष डॉ. हरिदास तुपटे यांच्या हस्ते जिल्हा परिषद माध्यमिक शाळा चोरटी येथे नुकताच एक स्मार्ट टीव्ही संच भेट



देण्यात आला.

यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना डॉ. हरिदास तुपटे यांनी या उपक्रमामागील भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, 'केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणे ही काळाची गरज आहे. ग्रामीण भागातील मुले कोणत्याही बाबतीत मागे राहू नयेत, या शैक्षणिक दायित्वाच्या भावनेतूनच हा स्मार्ट टीव्ही शाळेला देण्यात आला आहे.'

या कार्यक्रमास शाळेच्या मुख्याध्यापक अनीता विखार, शिक्षक गायधणे, बनकर, सुरणाम तसेच राधा ऑर्गनायझेशनचे उपाध्यक्ष बनसोड सर प्रामुख्याने उपस्थित होते. सोबतच स्थानिक ग्रामस्थ अशोक राऊत, आनंदा प्रधान, प्रीती गेडाम, श्रीराम राऊत, गंगाधर बुराडे, उद्धव कोरवाते, विनोद राऊत यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ब्रम्हपुरी योग समितीची कार्यकारिणी गठित

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी योग समिती ची विशेष सभा पंढरीतीजी खानोरकर माजी अध्यक्ष यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. यामध्ये ब्रम्हपुरी योग समिती चे माजी उपाध्यक्ष स्वर्गीय डॉ. विलासराव गजपुरे यांना मौन श्रद्धांजली वाहण्यात आली. दरम्यान नुतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्ष म्हणून भगवानजी कन्नाके, उपाध्यक्ष दासबोधजी गोडे, गजाननराव बुरले, कार्याध्यक्ष पदी डॉ .बाळकृष्ण शेळके, सचिव राजू भागवत, सहसचिव प्रकाश धोरूडे, कोषाध्यक्ष दिलीपजी जुमडे, तर सल्लागार समितीत पंढरीजी खानोरकर, अनिल चिलमवार, भाऊरावजी बांगरे कार्यकारिणी सदस्य म्हणून पुरूषोत्तमजी पत्रे, सुरेशजी काळबांधे, एकनाथजी दोनाडकर, संजयजी काकडे, अनिलजी मुडे, श्रावणजी ढोरे, रत्नाकरजी ढोरे, दिलीपभाऊ भूपाल, घनशामजी कावळे, डॉ.गिरीशजी शेंडे यांची निवड करण्यात आली. मागील सभेचे इतिवृत्त वाचन भगवान कन्नाके यांनी केले. उपस्थितांचे आभार भागवत सर यांनी मानले.

# १०० वर्षांहून अधिक काळाची परंपरा असलेला भुजलिया उत्सव साजरा

ब्रम्हपुरी/का.प्र.

रंगारी समाज ब्रम्हपुरीच्या वतीने शंभर वर्षांहून अधिक काळापासून सुरू असलेला पारंपरिक भुजलिया उत्सव यंदाही मोठ्या उत्साहात व पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. समाजाची संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकतेचे दर्शन घडविणाऱ्या या उत्सवाला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

भुजलिया उत्सवातील प्रमुख आकर्षण म्हणजे समाजातील माता-भगिनींकडून भुजलिया (गौरी) घेऊन



काढण्यात येणारी पारंपरिक मिरवणूक. पारंपरिक वाद्यांच्या गजरात या मिरवणुकीची सुरुवात गांधीनगर, ब्रह्मपुरी येथून झाली. त्यानंतर रेणुका माता चौक मार्गे मिरवणूक दुर्गा मंगल कार्यालय येथे पोहोचून उत्साहात संपन्न झाली. पारंपरिक वेशभूषा, वाद्यांचा गजर आणि समाजबांधवांचा उत्साह यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय व उत्साहपूर्ण झाले. भुजलिया उत्सवाच्या माध्यमातून समाजात नवीन जावई व नववधूंचे विशेष स्वागत करण्याची परंपराही जपली जाते. समाजातील नव्या नात्यांचे स्वागत करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहाशी जोडण्याचा हा अनोखा उपक्रम आहे.

रंगारी समाजाच्या अध्यक्षस्थानी समाजाध्यक्ष सचिनजी चुन्हे, उपाध्यक्ष पारस सेठिया तसेच सचिव राहुल शेटीये यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख अतिथी म्हणून प्रशांती घोडासारिया, सहाय्यक लेखाधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर, तसेच रमेशजी बंशपाल, बालाघाट आणि गणेशजी चुन्हे, हिर्री, बालाघाट यांची उपस्थिती लाभली. समाजातील होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व प्रोत्साहन निधी देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या या उपक्रमाचे समाजबांधवांनी कौतुक केले.

भुजलिया उत्सवाचे आयोजन सुरळीत व शिस्तबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी विशेष भुजलिया उत्सव समिती गठित करण्यात आली होती. समितीचे अध्यक्ष लक्कीसिंग बिलगय्या, उपाध्यक्ष मुक्तानंद चुन्हे व सचिव निखिल चुन्हे यांच्यासह समितीच्या सदस्यांनी कार्यक्रमाचे उत्तम नियोजन व व्यवस्थापन केले.

# बारा दिवसीय एक्युप्रेशर मार्गदर्शन शिबीर संपन्न



ब्रह्मपुरी/का.प्र.

श्री साई मंदिर देवस्थान विद्यानगर ब्रह्मपुरीच्या संचालक मंडळाच्या सहयोगाने व महाराष्ट्र ग्रामीण आरोग्य व विकास संस्था नागपूरच्या विद्यमाने आयोजित एक्यूप्रेशर व चुंबकीय चिकित्सा शिबिरात कंबर, पाठ मानेचे दुखणे, स्पाडलाइटीज, मधुमेह रक्तदाब ,पोटाचे विकार, मायग्रेन, गुडघेदुखी, झायटीका इत्यादी सर्व शरीराच्या आजारावर एक्यूप्रेशर व चुंबक शस्त्रक्रिया द्वारे केले जात आहे.

मंदिरात पार पडलेल्या १२ दिवसीय एक्यूप्रेशर, सुयोक - अॅक्युप्रेशर, चुंबक चिकित्सा शिबिरात आतापर्यंत ५४ रुग्ण लाभ घेतला असल्याची माहिती थेरपीस्ट राजेश सुट्टेवार, थेरपीस्ट वसंत कुमार शेंडे, पेपरपिस्ट मनीष वानखेडे यांनी दिली. दिनांक २८ ऑगस्ट २०२६ ते ८ सप्टेंबर २०२६ पर्यंत सुरू असलेल्या या शिबिरात सध्या ५४ रुग्णांनी लाभ घेतला. नागपूर येथील महाराष्ट्र ग्रामीण आरोग्य व बहुउद्देशीय संस्थेचे थेरपीस्ट राजेश सुटेवार, थेरपीस्ट वसंत कुमार शेंडे, थेरीपिस्ट मनीष वानखेडे तथा श्री साई मंदिर देवस्थान विद्यानगर मंडळाचे अध्यक्ष नंदू पिसे, गिताबाई कुंभारे (उपाध्यक्ष), महेश पिलारे (सचिव ), ऋषी चुन्हे (कोषाध्यक्ष), सदस्य उद्धव राऊत, राजेश हेमके, रवी मेश्राम, मनोज बन ,श्रीमती कविता समर्थ, काशिनाथ मेश्राम इत्यादींनी सहयोग दिला.

# महावितरणची खुली डीपी तातडीने दुरूस्ती करण्याची मागणी

ब्रम्हपुरी/का.प्र.

श्रीराम नगर, गोसेखुर्द कालव्याच्या बाजूला रोडच्या किनारी, जुनी वस्ती आणि नवीन वस्तीच्या मधोमध महावितरणची विद्युत डीपी अनेक वर्षांपासून खुल्या अवस्थेत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. डीपीला संरक्षणात्मक झाकण नसल्याने त्यातील जिवंत विद्युत वाहिन्यांमुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे.

ही डीपी रस्त्यालगत असलेल्या चौकात असल्याने परिसरातून नागरिकांची सतत ये-जा सुरू असते. तसेच या ठिकाणी लहान मुले खेळत असल्याने एखाद्या बालकाने अनवधानाने डीपीला हात लावल्यास मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या डीपीमुळे परिसरातील वीजपुरवठाही वारंवार खंडित होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे.

महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांनी या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन खुल्या डीपीची पाहणी करून आवश्यक ती दुरुस्ती करावी आणि झाकण असलेली नवीन डीपी बसवावी, अशी मागणी तंटामुक्ती अध्यक्ष किशोर लाडे यांनी केली आहे.

# राखी प्रदर्शनीत कौशल्य शिक्षणाचा अविष्कार



ब्रम्हपुरी/का.प्र.

'स्वहस्ते तयार केलेली राखी... श्रम, प्रेम आणि संस्कारांची उबदार भेट!' या भावनेतून जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, हळदा येथे आयोजित करण्यात आलेल्या राखी निर्मिती, विक्री व प्रदर्शन उपक्रमाला गावकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेला सर्जनशीलतेची जोड देत बाजारात उपलब्ध राख्यांप्रमाणेच आकर्षक आणि दर्जेदार राख्या तयार करून कौशल्य शिक्षणाचा प्रेरणादायी नमुना साकारला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्ये, उद्योजकता आणि व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षणासोबत प्रत्यक्ष कृतीतून शिकण्याची संधी मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास अधिक बळकट झाला. प्रदर्शनीच्या उद्घाटनप्रसंगी हनुमान देवस्थानचे उपाध्यक्ष प्रभुजी जरूरकर, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य ज्ञानेश्वर झरकर, गोविंद गोशाळेचे संचालक विलास राऊत तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता रासेकर, अशोक नागोसे उपस्थित होते.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विनोद मदनकर यांनी प्रमुख समन्वयक म्हणून पुढाकार घेतला. तसेच अनंता भोयर, रेखा ढोरे, वैशाली नारलावार, सुषमा ठेंगरे, सुशिकला चांदेवार, स्वाती नागपुरे, संदीप राऊत आणि विनोद चहांदे यांनी मोलाचे सहकार्य केले.

# प्रतिकुल परिस्थितीत अन्हेरच्या तिघा जणांची शिक्षक पदी निवड





ब्रम्हपुरी/का.प्र.

नुकत्याच शिक्षक पदाच्या जाहीर झालेल्या निवड यादीत ब्रह्मपुरी तालुक्यातील अन्हेरनवरगांव येथील मंगेश जराते, अमित मलगाम आणि विपुल खोब्रागडे या तिघांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत ग्राम वाचनालय, अन्हेरनवरगांव येथे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करून टीईटी परीक्षेत यश संपादन केले आणि शिक्षक पदाच्या निवड यादीत आपले नाव समाविष्ट केले.

मंगेश जराते भंडारा जिल्हा, अमित मलगाम लातूर जिल्हा व विपुल खोब्रागडे चंद्रपूर जिल्हा या ठिकाणी ते शिक्षक म्हणून रुजू होणार आहेत. शिक्षक म्हणून निवड झाल्याबद्दल या तिघांचाही सत्कार व अभिनंदन अभियंता आकाश खोब्रागडे, अभियंता प्रथम लोखंडे आणि सुरेश बनकर व गायन पार्टी यांनी पुष्पगुच्छ व शाल देऊन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम द्या अन्यथा आंदोलन पेटणार

## सकल ओबीसी महामोर्चाचा केंद्र सरकारला इशारा




ब्रम्हपुरी/का.प्र.

आगामी जनगणनेमध्ये इतर मागासवर्गीयांसाठी (OBC) स्वतंत्र कॉलम समाविष्ट करून संगणकीय 'ड्रॉप-डाऊन मेन्यू'च्या माध्यमातून अचूक जातनिहाय नोंदणी करण्यात यावी, अशी ठाम मागणी सकल ओबीसी महामोर्चा, ब्रम्हपुरी यांच्या वतीने करण्यात आली आहे. ही मागणी मान्य न झाल्यास आगामी जनगणनेवर बहिष्कार टाकण्यासह देशव्यापी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा ओबीसी समाजबांधवांनी दिला आहे.

या मागणीसंदर्भात सकल ओबीसी महामोर्चा, ब्रम्हपुरी यांच्या वतीने उपविभागीय अधिकारी, ब्रम्हपुरी यांच्या मार्फत भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांना निवेदन देण्यात आले. निवेदन देताना ब्रम्हपुरी परिसरातील मोठ्या संख्येने ओबीसी बांधव उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की, इतर मागासवर्गीय समाजाची अचूक लोकसंख्या आणि सामाजिक-आर्थिक स्थिती समोर येण्यासाठी आगामी जातनिहाय जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र व्यवस्था असणे अत्यंत आवश्यक आहे. मात्र, ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम न ठेवता ओपन-एंडेड (Open-ended) स्वरूपात जात विचारण्याच्या पद्धतीबाबत महामोर्चाने तीव्र आक्षेप नोंदविला आहे.

महामोर्चाच्या म्हणण्यानुसार, सन २०११ मधील सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणनेत (SECC) ओपन-एंडेड पद्धतीमुळे देशभरातून तब्बल ४६ लाख ७० हजारांहून अधिक जाती व पोटजातींच्या नोंदी झाल्या होत्या. उच्चार, स्पेलिंग आणि स्थानिक नावांमधील फरकामुळे हा डेटा सदोष ठरल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) यांच्याप्रमाणेच ओबीसी प्रवर्गासाठीही स्वतंत्र कॉलम देण्यात यावा. तसेच केंद्रीय व राज्यस्तरीय मागासवर्गीय याद्यांच्या आधारे संगणकीय 'ड्रॉप-डाऊन मेन्यू' तयार करून जातनिहाय नोंदणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम नसल्यास समाजाची खरी लोकसंख्या व सामाजिक-आर्थिक वास्तव समोर येणार नाही. त्याचा परिणाम शिक्षण, रोजगार, बजेट वाटप आणि आरक्षणाच्या धोरणांवर होऊ शकतो. यावेळी उपस्थित ओबीसी बांधवांनी स्पष्ट इशारा दिला की, आगामी जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलमचा समावेश न झाल्यास ओबीसी समाज जनगणनेवर बहिष्कार टाकेल व तीव्र देशव्यापी आंदोलन उभारेल.

❀❀❀❀❀❀

# विदर्भ तेली महासंघाची कार्यकारिणी गठित

## अध्यक्ष पदी डॉ. रविंद्र विखार तर सचिव जगदिश मेहेर





ब्रह्मपुरी/का.प्र.

श्री संताजी बहुउद्देशीय सेवा मंडळ व विदर्भ तेली महासंघ शाखा ब्रह्मपुरीची संयुक्त आमसभा अध्यक्ष डॉ. सतीश कावळे यांच्या अध्यक्षतेखाली थानेश्वर कायरकर, डॉ. रामेश्वर राखडे, डॉ. मंजुषा साखरकर, डॉ. प्रभूदासजी चीलबुले, राजेंद्र ठोंबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. राखडे सभागृहात नूतन कार्यकारणी नुकतीच गठित करण्यात आली. यात अध्यक्षपदी प्रा.डॉ. रवींद्र विठोबा विखार तर सचिव पदी जगदीश जयवंत मेहेर यांची तर महिला अध्यक्षपदी ॲड. मनीषा अविनाश बंडे तर सचिव कीर्तीताई झाडे यांची निवड करण्यात आली.

याप्रसंगी पुढील पाच वर्षाकरिता जम्बो कार्यकारणीची घोषणा करण्यात आली. कार्याध्यक्षपदी जी.टी. दांडेकर, उपाध्यक्ष प्राचार्य सुयोग बाळबुद्धे, डॉ.परेश सेलोकर, सहसचिव संजय पिसे, अनंता करंबे, कोषाध्यक्ष अरविंद साखरकर, जिल्हा संघटक डॉ. रामेश्वर राखडे, जिल्हा सदस्य यशवंत कांमडी, तालुका संघटक राकेश पडोळे, उपसंघटक डॉ.नाजुकराव खडाईत, सुरेशजी टीकले ,शहर संघटक नानाजी सेलोकर, पंढरीची पिसे, युवा संघटक विजय कावळे, युवा उपसंघटक अमोल करकाडे, प्रसिद्धी प्रमुख प्रा. कोमलकांत ठोंबरे, सदस्य डॉ. परसराम नागोसे, उमाकांत करंबे, शरद जिभकाटे, सदस्य संतोष टिकले, दिलीप बावनकर, सुधीर सहारे, मनोहर आंबोरकर, सल्लागार प्राचार्य शंकरराव उराडे, आत्मारामजी आंबोरकर, गंगाधर कावळे, प्रा. मेजर विनोद नरड यांची अविरोध निवड करण्यात आली.

# योग्य पाणी वापर करणे आपले कर्तव्य - अंबर कुडमते

### पाणी वापर संस्था सक्षमीकरण व बळकटीकरण उपक्रम



ब्रह्मपुरी/का.प्र.

पाणी ही निसर्गाची देण आहे. प्रत्येक प्राणीमात्रांसाठी पाणी हे आवश्यक असून पाण्याचा योग्य साठा करुन ठेवणे आवश्यक आहे. योग्य पाणी वापर करणे हे आपले कर्तव्य आहे, असे विचार अंबर कुडमतेनी मांडले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीच्या संयुक्त विद्यमाने पाणी वापर संस्था सक्षमीकरण व बळटीकरण उपक्रमात बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर तर उपस्थितीत डॉ राजेंद्र डांगे, डॉ रेखा मेश्राम, डॉ धनराज खानोरकर, डॉ युवराज मेश्राम, अमित घोंगडे, सूरज मुळे, धनराज नन्नवरे व विद्यार्थी बहूसंख्येने उपस्थित होते. संचालन डॉ युवराज मेश्राम तर आभार प्रदर्शन डॉ खानोरकरांनी केले.

# ज्ञानदीप प्रशासकीय महाविद्यालयात बक्षीस वितरण सोहळा




ब्रम्हपुरी/का.प्र.

ज्ञानदीप प्रशासकीय महाविद्यालय, चौगान येथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीचा गौरव करण्यासाठी भव्य बक्षीस वितरण व गुणगौरव सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या मेहनत, परिश्रम, सातत्य आणि उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत विविध स्पर्धा, शैक्षणिक गुणवत्ताक्रम तसेच क्रीडा क्षेत्रांत प्रावीण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान प्रवेश प्रक्रियेत महाविद्यालयाला मोलाचे सहकार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांचाही विशेष गुणगौरव व सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला पी.एस.आय. लोखंडे साहेब पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी, सब-इन्स्पेक्टर येरणे साहेब, माजी मुख्याध्यापक भानारकर सर, आनंदरावजी ठाकरे, बोरीकर सर, संस्थेचे अध्यक्ष निहाटे सर, राहुलजी मैंद पत्रकार, गेडाम साहेब, लिचडे साहेब, विद्या विलास राऊत, थाटकर साहेब, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रधान मॅडम, कॉन्व्हेंट चे प्राचार्य मैंद मॅडम, प्राध्यापक वर्ग, कॉन्व्हेंट चे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन खुशी सहारे आणि आभार प्रदर्शन मानसी दरवरे यांनी केले.

### ... QUOTES ...

"What's in a book is not what the author put into it, it's what the reader gets out if it."

- William Golding

### चारोळी

अजून तू मुलींनाच
हसून करतोस विश...
त्यापेक्षा डासांना कर,
जे तुला करतात किस...

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

# नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालयात शिक्षक पालक सहविचार सभा

ब्रह्मपुरी/का.प्र.

नेवजाबाई हितकारिणी कन्या विद्यालय ब्रह्मपुरी येथे सत्र २०२६-२०२७ ची 'शिक्षक पालक सहविचार सभा' दिनांक २९ ऑगस्ट २०२६ रोज शनिवारला आयोजित करण्यात आली.

यांप्रसंगी कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया, शिक्षण विस्तार अधिकारी गायत्री तोराम मॅडम, कार्यक्रमाच्या अध्यक्षा शाळेच्या मुख्याध्यापिका बनपूरकर मॅडम, उपाध्यक्ष पालक प्रतिनिधी महेश येरमे व स्त्री पालक प्रतिनिधी शितल फटिंग, उपमुख्याध्यापक निखारे सर, पर्यवेक्षिका खंडाते मॅडम, दलाल मॅडम, सेलोकर मॅडम, शेंडे मॅडम मंचावर उपस्थित होते.



कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व मान्यवरांच्या स्वागताने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक निखारे सर यांनी केले व नंतर पालकांचे प्रश्न, समस्या, तक्रारी घेण्यात आल्या व त्यावर सांगोपांग चर्चा झाली. पालकांच्या अपेक्षांचे स्वागत करण्यात आले व शाळा पुरवत असलेल्या सोयी सुविधांसाठी पालकांनी शाळेचे आभार मानले अशा पद्धतीने अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात विद्यार्थी विकासासाठी कराव्या लागणाऱ्या गोष्टींचे विचारमंथन करण्यात आले. शिक्षण विस्तार अधिकारी तोराम मॅडम या पालक म्हणून सभेला उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या भाषणात पाल्यांकडून होणारा मोबाईलचा अतिरेकी वापर व पालकांची भूमिका यावर प्रकाश टाकला. अशोक भैया यांनी पालकांच्या शंकांचे निरसन करत पालक वर्गाने जागरूक होण्याचे आवाहन केले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षा बनपूरकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यालय कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी नगराळे मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन उज्वला भूंबर मॅडम यांनी मानले.

# चार सराईत गुन्हेगारांना तडीपारीचा दणका

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी पोलिस स्टेशन रेकॉर्डवरील गुन्हेगार संजय मधुकर लांजेवार, वय-५२ वर्षे, रा. फुलेनगर ब्रम्हपुरी, सुरज नामदेव बगमारे, वय-३७ वर्षे, रा. बोंडेगाव हुळकी ब्रम्हपुरी, कमलसिंग मायासिंग जुनी, वय-२५ वर्षे, रा. मेंडकी ता. ब्रम्हपुरी, व वैभव उर्फ गोलु नानाजी राउत, वय-३० वर्षे, रा. गणेशपुर ता. ब्रम्हपूरी यांचे विरुद्ध अवैध दारू विक्रीचे व जुगाराचे मोठ्या प्रमाणावर गुन्हे दाखल असून, त्यांचेविरूद्ध यापूर्वी प्रतिबंधक कारवाई करण्यात आल्यानंतरही त्यांचे वर्तनात कोणतीही सुधारणा झाली नाही.

वरील चारही इसमाचे अशाप्रकारचे वागण्यामूळे सर्वसाधारण माणसामध्ये असूरक्षेततेची भावना निर्माण झाली होती. त्यामूळे सदर सराईत गुन्हेगार यांना हद्दपार करणे असल्याने, सदर गुन्हेगार याचेविरूद्ध दाखल असलेल्या अपराधाबाबत पुरावे गोळा करून, पोलिस अधिक्षक आयुश नोपानी, अप्पर पोलिस अधिक्षक ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलिस अधिकारी साहील झरकर, पोलिस निरिक्षक प्रमोद बानबले यांचे मार्गदर्शनात, सपोनि मनोज खडसे सोबत पोहवा मूकेश गजबे, मिलींद नैताम, पोलिस अंमलदार प्रविन भिवगडे, इरशाद खान, निलेश तूमसरे, स्वप्नील पळसपगार व वशिष्ट रंगारी यांनी सदर अवैध दारू विक्रेते यास हद्दपार करणेसाठी, त्याचे विरुद्ध दाखल गुन्ह्याचे कागदपत्रे प्राप्त करून हद्दपार प्रस्ताव तयार करून तो प्रस्ताव उपविभागीय दंडाधिकारी, ब्रम्हपूरी, यांचेकडे पाठविण्यात आला. सदर प्रकरणामध्ये संपूर्ण कायदेशीर कार्यवाही झाले नंतर मा. उपविभागीय दंडाधिकारी, ब्रम्हपूरी यांनी दिनांक १९/०८/२०२६ रोजी चारही जणांना पूढील ०१ महीन्यापर्यंत चंद्रपूर जिल्हयाचे क्षेत्रामधून हद्दपार करण्याचा आदेश पारीत केला. सदर अवैध दारू विक्रेते व सटटापटटीचा जुगार खेळणाऱ्यींचे वर्तनात कोणतीही सूधारणा न होता ते अवैधरित्या दारू विक्री व सटटापटटीचा जुगार खेळत होते. यामूळे परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले होते.

वरील चारही इसमांना पूढील ०१ महिन्यापर्यंत चंद्रपूर जिल्हयाच्या हद्दीतून हद्दपार करण्याचा आदेश पारीत करण्यात आला आहे. चौघांनाही तडीपार केल्यामूळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.




Miracle constructions & Developers

श्रीराम नगरी - डेव्हलपर्स

NATP प्लॉट्स उपलब्ध

- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501

डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



**- पाहिजेत -**

**श्रीराम नागरी सहकारी पत संस्था मर्या. ब्रम्हपुरी**

शिवाजी चौक, आरमोरी रोड, बस स्टॉपजवळ, ब्रम्हपुरी

मो.नं. 9421722026, 9420880113 र.नं. १००४

संस्थेत कार्यालीयन कामाकरीता लिपीक या पदाकरीता अर्ज मागविण्यात येत आहे. वयाची अट (२५ ते ३० वर्षे)

लिपीक पदासाठी खालील पात्रता आवश्यक राहील

१. अर्जदार हा कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा. वाणिज्य शाखेच्या पदवीधरास प्राधान्य देण्यात येईल.
२. अर्जदारास संगणक हाताळण्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
३. कर्ज प्रकरण हाताळण्यासंबंधीचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल.
४. संस्थेच्या सेवा नियमानुसार मानधन तत्त्वावर नियुक्ती करण्यात येईल.

अर्ज करण्याची अंतिम तारिख
**19.09.2026**

(अर्जासोबत पासपोर्ट साईज फोटो, आधार कार्ड व शैक्षणिक कागदपत्रांच्या साक्षांकित झेरॉक्स प्रती जोडणे आवश्यक)

अध्यक्ष — श्री.बाळू काळीकर
मुख्य कार्यकारी अभियंता — श्री.संजय पुल्लीवार

श्रीराम नागरी सहकारी पत संस्था मर्या. ब्रम्हपुरी


# मल्लिकार्जून खरगे यांच्या भाषणस्थळी कथित शुध्दीकरणाचा ब्रम्हपुरी काँग्रेसकडून निषेध



ब्रम्हपुरी/का.प्र.

काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या हळद्वानी येथील सभेनंतर सभास्थळी कथितरीत्या शुद्धीकरण करण्यात आल्याच्या प्रकाराचा काँग्रेसच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या घटनेची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच या प्रकारावर भाष्य केल्यामुळे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेला गुन्हा रद्द करावा, अशी मागणी काँग्रेसच्या वतीने करण्यात आली. याबाबतचे निवेदन बुधवारी ब्रम्हपुरीच्या उपविभागीय अधिकाऱ्यांना देण्यात आले. निवेदन देताना काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


Lubi PUMPS-MOTORS | बुधवार बंद | - दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.

सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता

**गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी**

रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी

फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053

Kirloskar | CRI

ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत

किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404